<u>ठराव क्रमांक 42</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या जाहिराती, वर्तमानपत्र, रेडीओ व टि.व्ही. इत्यादी प्रसार माध्यमांद्वारे प्रकाशीत करण्यासाठी जाहिरातीचे आर्टवर्क तयार करणे व रिलीज करण्यासाठी जाहिरात एजन्सी मे.प्रॉफीट ॲडव्हरटायझर्स (इंडीया) प्रा.लि.शंकरनगर नागपूर यांची दोन वर्षाकरीता नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 43</u> :– ई–गव्हर्नन्स साठी महानगरपालिकेला स्वतःचे डाटा सेंटर उभारण्यासाठी सर्व Hardware तसेच Infrastructure महानगरपालिकेने खरेदी करण्याऐवजी, महानगरपालिकेला निविदाकाराने स्वतः डाटा सेंटर बांधा वापरा व हस्तांतरीत करा (BOT Basis) अथवा बांधा वापरा आणि वापरा तत्वावर (BO Basis) वर डाटा सेंटर उभारण्याकरिता निविदा बोलविण्यास्तव मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 44</u> :– वर्ष 2011–12 हे महानगरपालिचे जेएनएनयुआरएम प्रकल्पाकरीता अत्यंत महत्वाचे आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर झालेले प्रकल्प अंतिम टप्यात असून प्रगती पथावर आहेत. जेएनएनयुआरएम अंतर्गत नागपूर मनपा करीता मंजूर प्रकल्पाचे अनुषंगाने राज्य आणि केन्द्र शासनाला वेळोवेळी माहिती सादर करणे, मासीक व त्रैमासिक अहवाल तयार करणे गरजेचे असून राज्य आणि केन्द्र शासनाकडून अनुदानाचे हफ्ते मिळविण्याकरीता Reforms Task विहीत वेळेत पूर्ण करण्याकरीता तसेच जेएनएनयुआरएम प्रकल्पासंबंधित पाठपूरावा करणे आवश्यक आहे. अन्यथा अनुदान थांबण्याची शक्यता आहे.

वरील परीस्थिती टाळण्याकरीता मे. क्रीसील या संस्थेला Third Party Check ठेवणारी संस्था म्हणून 2011–12 या वर्षाकरीता अनुबंधित करण्यास हरकत नाही. मेसर्स क्रीसील ही संस्था केन्द्र शासनाद्वारे गठीत जेएनएनयुआरएम सल्लागार समिती मध्ये समाविष्ठ आहे. मनपाचे सीडीपी दस्ताऐवज मे. क्रीसील यांच संस्थेने तयार केलेले आहेत. अशा संस्थेस जेएनएनयुआरएम संबंधित मनपा चे कामे दिल्यास म्हणून Third Party Check म्हणुन केन्द्र व राज्य शासनास सादर केलेल्या प्रत्येक अहवालास विशिष्ट महत्व राहील. त्यामुळे जेएनएनयुआरएम च्या शेवटच्या वर्षात जेएनएनयुआरएम अंतर्गत चालू असलेल्या प्रकल्पांना शासकीय अनुदान प्राप्त होण्यास अत्यंत मोलाची मदत होईल.

करीता मे. क्रीसील यांना रु. 4.0 लक्ष प्रती माह आणि 10.3% सेवा शुल्क सह एकूण रुपये 52.92 लक्ष प्रती वर्ष प्रमाणे खर्चाला मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन शासनाचा ठराव क्र. MVP-2008/C.R.91/SP, Dt. 24-11-2009 मध्ये Schedule-A, Goi Empanelled Transaction Advisory मध्ये एकुण 7 सल्लागार समितीची नोंद आहे.

उपरोक्त प्रस्तावात एकुण रु. 52.94 लक्ष प्रती वर्ष खर्च होणार आहे. एवढा मोठा खर्च एखादया संस्थेला निविदा द्वारे न देता कसा करता येईल किंवा इतर म.न.पा. नी कार्यादेश दिले म्हणून हया स्थायी समितीला तसे करता येणार नाही.

म.न.पा.च्या आर्थीक खर्चात बचत व्हावी या दृष्टीने शासनाच्या ठरावात नमुद इतर 7 सल्लागार समित्या मधून, E.O.I. मागवून निविदा मागविण्यास एकमताने मंजूरी प्रदान करते.

तसेच म.न.पा.चे सी.डी.पी. दस्ताऐवज मे. क्रिसील या संस्थेने तयार केले आहे. असे विभागाचे मत आहे. ते सर्व दस्ताऐवज (White Paper) व ते करण्याचे काम देतांना कोणती पध्दत कार्यालयाने अवलंबविली होती, त्याची संपूर्ण माहिती पूढील स्थायी समितीच्या सभेत कार्यालयाने ठेवावे असा समितीने एकमताने निर्णय घेतला.

कामाचे खर्च CDF मधून प्रस्तावित आहे.

<u>ठराव क्रमांक 45</u> :– स्थायी समिती ठराव क्र. 51., दि. 29.06.2010 च्या मंजुरी अन्वये नागपूर महानगरपालिकेच्या विविध विभाग व झोनल कार्यालयामध्ये असलेली मालमत्तेची व इमारतीची देखरेख व सुरक्षा करण्याकरीता महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ, पूणे (मेस्को) यांचे कडून एकुण 06 पर्यवेक्षक, 42 बंदुकधारी सुरक्षा रक्षक व 135 बिना बंदुकधारी सुरक्षा रक्षक त्याच प्रमाणे एकुण 04 खाजगी सुरक्षा एजन्सीचे एकुण 42 बंदुकधारी सुरक्षा गार्ड, 519 बिना बंदुकधारी सुरक्षा गार्ड व 37 खाजगी बहुउद्देशिय सुरक्षा गार्ड लावण्यात आलेले आहे.

(अ) स्थायी समिती ठराव क्र. 51., दि. 29.06.2010 च्या मंजुरी अन्वये दि. 16.07.2010 पासुन दि. 15.07.2012 पर्यत असे एकुण दोन वर्षा करीता एकुण 04 खाजगी सुरक्षा एजन्सीचे एकुण 42 बंदुकधारी व 519 बिना बंदुकधारी सुरक्षा गार्ड तसेच 37 खाजगी बहुउद्देशिय सुरक्षा गार्ड लावण्यात आलेले आहेत.

या निविदाची मुदत दि. 15.07.2012 ला संपुष्टात येत असल्यामुळे व या निविदाची मुदत संपण्या पुर्वीच्या कालावधी मध्ये म.न.पा. ची सार्वजनिक निवडणुक ची आचारसंहीता लागु होण्याची शक्यता असल्यामुळे व नविन निविदाची प्रकिया पूर्ण करायला वेळ लागण्याची शक्यता आहे. करीता पुढील दोन वर्षाच्या कालावधीसाठी (सन 2012–13 व 2013–14) नवीन निविदा शासनाचे किमान वेतन व इतर लागु असलेले भत्ते राहतील त्याप्रमाणे, नवीन निविदा बोलाविण्या करीता प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने नामंजूरी प्रदान केली.

(ब) स्थायी समिती ठराव क्र. 51., दि. 29.06.2010 च्या मंजुरी अन्वये महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ, पूणे (मेस्को) यांचे कंत्राट दि. 16.07.2010 पासुन दि. 15.07. 2011 पर्यत असे एक वर्षा करीता एकुण 06 पर्यवेक्षक, 42 बंदुकधारी सुरक्षा रक्षक व 135 बिना बंदुकधारी सुरक्षा रक्षक शासनाचे किमान वेतन व इतर लागू असलेले भत्ते प्रमाणे लावण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य माजी सैनिक महामंडळ, पुणे (मेस्को) यांचे कंत्राटाची मुदत दि. 15.07.2011 ला संपुष्टात येणार असल्यामुळे या कंत्राटाला दि. 16.07.2011 पासुन दि. 15.06.2013 असे दोन वर्षाकरीता जुन्याच करारनामाच्या अटी व शर्ती प्रमाणे त्याप्रमाणे एकुण 06 पर्यवेक्षक, 42 बंदुकधारी व 135 बिना बंदुकधारी सुरक्षा रक्षकाला मुदतवाढ व त्यासाठी होणारा खर्चास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

हा खर्च पद क्र. 20 मधुन करण्यात येईल.

++ ++ ++

**ठराव क्रमांक 46** :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर